खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### मराठी विभाग : दिवाळी अंक वाटप

» Selected



## सामाजिक प्रगल्भतेसाठी वाचन हवे : नानासाहेब टाकळकर

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक धारणा व सामाजिक जाणिवा प्रगल्भ होण्यासाठी वाचन आवश्यक असून, दिवाळी अंकांच्या माध्यमातून वाचन परंपरेचे जतन करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, विशाल थिगळे आदी उपस्थित होते. नानासाहेब टाकळकर यांनी पुढे बोलताना विद्यार्थ्यांनी समाजमाध्यमांच्या आहारी न जाता अधिकाधिक अवांतर वाचन करून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचे आवाहन केले. यावेळी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांसह अपेक्षा कर्वे व ऋषिकेश काची या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. निबंध स्पर्धेतील सहभागी १०० विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचा युवा व बालकुमार दिवाळी अंक व वाचनीय पुस्तके भेट देण्यात आली. ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांनी डिजिटल ग्रंथालय या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

केसरी
राष्ट्रीय ठेवा

## सामाजिक प्रगल्भतेसाठी वाचन हवे : नानासाहेब टाकळकर



राजगुरुनगर, (वार्ताहर) : विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक धारणा व सामाजिक जाणिवा प्रगल्भ होण्यासाठी वाचन आवश्यक असून दिवाळी अंकांच्या माध्यमातून वाचन परंपरेचे जतन करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, विशाल थिगळे उपस्थित होते. टाकळकर यांनी पुढे बोलताना विद्यार्थ्यांनी समाजमाध्यमांच्या आहारी न जाता अधिकाधिक अवांतर वाचन करून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांसह अपेक्षा कर्वे व ऋषिकेश काची या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाने अभिवाचन, काव्यवाचन, निबंध स्पर्धा, व्याख्यान, दिवाळी अंक भेट आदी उपक्रमांचे आयोजन केले. चाकण कला वाणिज्य महाविद्यालयाचे डॉ. शिवाजी एंडाईत यांनी व्यक्तिमत्त्व विकास व वाचनसंस्कृती या विषयावर मार्गदर्शन केले.मला प्रभावित करून गेलेले पुस्तक या विषयावरील निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक अपेक्षा कर्वे (माती,पंख आणि आकाश - ज्ञानेश्वर मुळे), द्वितीय क्रमांक ऋषिकेश काची (पाणी पाणी- लक्ष्मीकांत देशमुख), तृतीय क्रमांक स्नेहल देवदरे (श्यामची आई- साने गुरुजी) यांचा आला. निबंध स्पर्धेतील सहभागी १०० विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचा युवा व बालकुमार दिवाळी अंक व वाचनीय पुस्तके भेट देण्यात आली. इतिहास व ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांनी डिजिटल ग्रंथालय या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ संजय शिंदे यांनी केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**